# मिरा भाईंदर महानगरपालिका

पे अॅन्ड पार्क विभाग
जा.क्र.मनपा/पेअॅन्डपार्क/118/2018-19
दि. 15/03/2019

## दि.१५/०३/२०१९ रोजी मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली, झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत

पे अॅन्ड पार्क (अ) मिरा रोड स्टेशन जवळील मिरा रोड (पूर्व) या जागेतील आरक्षण क्र. 184 क्षेत्र 2,940 चौरस मीटर व (ब) मिरा रोड रेल्वे स्टेशन समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लॅडींगजवळ) येथील वाहनतळ या जागी परिशिष्ट 'ड' मधील नमूद पार्कींग क्षमतेसाठी खाजगी संस्थेमार्फत एक वर्षाच्या कालावधीसाठी पे अॅन्ड पार्क योजना राबविणेकरीता आणि वाहन चालक/मालकांकडून पार्कींग चार्जेस वसूल करणेकरीता मे. श्रुती इंटरप्रायजेस यांच्यासोबत महानगरपालिकेने दि.26/11/2018 रोजी करारनामा केलेला आहे. त्या अनुषंगाने उक्त ठेकेदार मार्फत करारनाम्याचे अटी शर्तीचे पालन करणे ठेकेदार यांच्यावर बंधनकारक आहे.

श्री. कृष्णा गुप्ता यांनी दि.19/12/2018 रोजीच्या तक्रारी अन्वये मे. श्रुती एंटरप्रायजेस हे पार्कींग करण्यासाठी येणाऱ्या नागरीकांकडून निश्चित दरापेक्षा दैनंदीन व मासिक पार्कींग करीता जास्त पार्कींग शुल्क वसूल करीत असल्यामुळे सदर ठेकेदार यांच्याविरुद्ध कार्यवाही करुन त्यांच्यासोबत केलेला करारनामा रद्द करण्यात यावा व ठेकेदार यांनी महानगरपालिकेकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन ठेकेदार यांच्याविरुद्ध संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने पे अॅन्ड पार्क विभागामार्फत शहानिशा करण्याकरीता प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन दि.04/01/2019 रोजीच्या वस्तुस्थिती दर्शक अहवाल अन्वये ठेकेदार निश्चित दरापेक्षा पार्कींग करीता जास्त दैनंदीन व मासिक पार्कींग शुल्क वसूल करीत असल्याची माहिती सादर केली. सदर तक्रार व विभागाच्या वस्तुस्थिती दर्शक अहवालाच्या अनुषंगाने अतिरीक्त आयुक्त यांचेकडे तक्रारदार व ठेकेदारासह दि.08/01/2019 रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यानंतरही सुनवण्या घेण्यात आलेल्या आहेत. सदर सुनावणीच्या अनुषंगाने ठेकेदार यांना दि.11/02/2019 रोजी नोटीस देऊन पे अॅन्ड पार्क या ठीकाणी नेमून दिलेल्या जागेव्यतिरीक्त अतिरीक्त जागेचा पार्कींगसाठी वापर करीत असल्यामुळे तसेच दि.13/02/2019 जा.क्र.मनपा/पेअॅन्डपार्क/110/2018-19 या प्रत्रान्वये पे अॅन्ड पार्क मासिक पासाद्वारे जादा वसुली रक्कम रु.1,67,230/- संबंधित दुचाकी धारकांना परतावा करणे किंवा पुढील मासिक पासेसमध्ये नेक्स्ट अॅडजस्टमेंट केले असल्याबाबतचा तपशिल नाव, वाहन क्रमांक व नेक्स्ट अॅडजस्टमेंट किंवा परतावा रकमेसंबंधी यादी 07 दिवसांत पे अॅन्ड पार्क विभागात सादर करणेबाबत, तसेच यापूढे करारनाम्यातील अटी शर्तीचे

पे अॅन्ड पार्क विभाग
जा.क्र.मनपा/पेअॅन्डपार्क/118/2018-19
दि. 15/03/2019

## दि.१५/०३/२०१९ रोजी मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली, झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत

पे अॅन्ड पार्क (अ) मिरा रोड स्टेशन जवळील मिरा रोड (पूर्व) या जागेतील आरक्षण क्र. 184 क्षेत्र 2,940 चौरस मीटर व (ब) मिरा रोड रेल्वे स्टेशन समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लॅडींगजवळ) येथील वाहनतळ या जागी परिशिष्ट ड मधील नमूद पार्कीग क्षमतेसाठी खाजगी संस्थेमार्फत एक वर्षाच्या कालावधीसाठी पे अॅन्ड पार्क योजना राबविणेकरीता आणि वाहन चालक/मालकांकडून पार्कींग चार्जेस वसूल करणेकरीता मे. श्रुती इंटरप्रायजेस यांच्यासोबत महानगरपालिकेने दि.26/11/2018 रोजी करारनामा केलेला आहे. त्या अनुषंगाने उक्त ठेकेदार मार्फत करारनाम्याचे अटी शर्तीचे पालन करणे ठेकेदार यांच्यावर बंधनकारक आहे.

श्री. कृष्णा गुप्ता यांनी दि.19/12/2018 रोजीच्या तक्रारी अन्वये मे. श्रुती एंटरप्रायजेस हे पार्कींग करण्यासाठी येणाऱ्या नागरीकांकडून निश्चित दरापेक्षा दैनंदीन व मासिक पार्कींग करीता जास्त पार्कींग शुल्क वसूल करीत असल्यामुळे सदर ठेकेदार यांच्याविरुद्ध कार्यवाही करुन त्यांच्यासोबत केलेला करारनामा रद्द करण्यात यावा व ठेकेदार यांनी महानगरपालिकेकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन ठेकेदार यांच्याविरुद्ध संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने पे अॅन्ड पार्क विभागामार्फत शहानिशा करण्याकरीता प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन दि.04/01/2019 रोजीच्या वस्तुस्थिती दर्शक अहवाल अन्वये ठेकेदार निश्चित दरापेक्षा पार्कींग करीता जास्त दैनंदीन व मासिक पार्कींग शुल्क वसूल करीत असल्याची माहिती सादर केली. सदर तक्रार व विभागाच्या वस्तुस्थिती दर्शक अहवालाच्या अनुषंगाने अतिरीक्त आयुक्त यांचेकडे तक्रारदार व ठेकेदारासह दि.08/01/2019 रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यानंतरही सुनवण्या घेण्यात आलेल्या आहेत. सदर सुनावणीच्या अनुषंगाने ठेकेदार यांना दि.11/02/2019 रोजी नोटीस देऊन पे अॅन्ड पार्क या ठीकाणी नेमून दिलेल्या जागेव्यतिरीक्त अतिरीक्त जागेचा पार्कीगसाठी वापर करीत असल्यामुळे तसेच दि.13/02/2019 जा.क्र.मनपा/पेअॅन्डपार्क/110/2018-19 या प्रत्रान्वये पे अॅन्ड पार्क मासिक पासाद्वारे जादा वसुली रक्कम रु.1,67,230/- संबंधित दुचाकी धारकांना परतावा करणे किंवा पुढील मासिक पासेसमध्ये नेक्स्ट अॅडजस्टमेंट केले असल्याबाबतचा तपशिल नाव, वाहन क्रमांक व नेक्स्ट अॅडजस्टमेंट किंवा परतावा रकमेसंबंधी यादी 07 दिवसांत पे अॅन्ड पार्क विभागात सादर करणेबाबत, तसेच यापूढे करारनाम्यातील अटी शर्तीचे

पालन न केल्यास दि.26/11/2018 रोजीचा करारनामा रद्द करण्यात येईल. व महानगरपालिका यांचेकडे ठेकेदाराने जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येवून ठेकेदार यांचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल, असे कळविण्यात आले. सदर पत्राच्या अनुषंगाने ठेकेदार यांनी पुर्तता करण्याबाबतची खात्री करण्याकरीता दि.08/03/2019 रोजी पुनःश्च सुनावणी घेण्यात आली सदर सुनावणीत ठेकेदार यांच्यावतीने श्री. अतुल ठाकूर हे उपस्थित राहून त्यांनी 874 नागरीकांचे रु.1,64,238/- रुपये पुढील महिन्याच्या पास मध्ये समाविष्ठ केल्याचे तक्रारदार श्री. कृष्णा गुप्ता यांची देखील रक्कम रु.187/- पुढील पासाकरीता दि.01/03/2019 रोजीकरीता समायोजीत केले व निविदेमध्ये नमुद 1730 वाहनांच्या पार्कींग क्षमतेऐवजी प्रत्यक्ष जागेवर साधारण 1300 पेक्षा जास्त वाहने उभी राहू शकत नाहीत त्यामुळे त्यांना प्रती महा 6 ते 7 लक्ष रुपये नुकसान होत आहे असा खुलासा सादर केला आहे. परंतू सदर सुनावणीत तक्रारदार हजर नसल्यामुळे आज शुक्रवार दि.15/03/2019 रोजी आयुक्त दालनात सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. बालाजी खतगांवकर | मा. आयुक्त |
| २ | श्री. डॉ. सुनिल लहाने | मा. अतिरीक्त आयुक्त |
| ३ | श्री. दिपक पुजारी | उपायुक्त पे ॲन्ड पार्क |
| ४ | श्री.जगदिश भोपतराव | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. कृष्णा गुप्ता | तक्रारदार |
| ६ | मे. श्रुती एंटरप्रायजेस यांचे प्रतिनीधी श्री. अतुल ठाकूर | प्रतिनिधी |

**श्री. कृष्णा गुप्ता यांनी आपले म्हणणे मांडले :-**

दि.11/12/2018 रोजी ठेकेदार यांनी पार्कींग करण्यासाठी निश्चित दरापेक्षा जास्त 20 मिनिटासाठी 25 रुपये घेतले त्यांचप्रमाणे दि.14/12/2018 रोजी मासिक पार्कींगसाठी रु.350 + 18% वस्तू व सेवाकर असे एकुण रु.413 ऐवजी रु.600 घेतले. त्यावेळेस ठेकेदार यांच्याकडून महानगरपलिकेचे जे वसूल करण्याचे निश्चित दरपत्रकाची मागणी केली असता ठेकेदार उपलब्ध करु शकले नाहीत. याबाबतीत ठेकेदार यांच्या विरुद्ध कारवाई करण्याकरीता वारंवार मागणी करुनही प्रशासनाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. तरी यापूर्वी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ठेकेदार यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी अशी मागणी करत आहे. त्याचप्रमाणे पे ॲन्ड पार्कच्या ठिकाणी महानगरपालिकेने पार्कींगसाठी निश्चित केलेले दर दर्शविण्यासाठी बोर्ड लावण्यात यावे अशी मागणी केली. तसेच सदर ठेकेदार यांच्या विरुद्ध संबंधित पोलीस स्टेशनमध्ये त्यांनी स्वत: फिर्याद दाखल केलेली आहे, असे महानगरपालिकेस सांगितले.

<u>सहा. आयुक्त यांनी आपले म्हणणे मांडले :-</u>

ठेकेदाराला पार्कींगसाठी तीन ठिकाणी अ) मिरारोड रेल्वे स्टेशन बस स्टॉप जवळ आरक्षण क्र.184 दुचाकी पार्कींग क्षमता-1550 व ब) मिरारोड रेल्वे स्टेशन समांतर स्कायवॉक खाली (सबस्टेशन व स्कायवॉक लॅडींग जवळ) दुचाकी पार्कींग क्षमता-180 जागा देण्यात आल्या आहेत. अशाप्रकारे एकुण 1730 दुचाकी पार्क करण्याचे अधिकार ठेकेदार मे. श्रुती इंटरप्रायजेस यांना देण्यात आलेले आहेत. श्री. कृष्णा गुप्ता यांच्या दि.29/11/2018 रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने पे ॲन्ड पार्क विभागामार्फत शहानिशा करण्याकरीता मी व माझे सहकारी श्रीम. मोघे (रहाटे) प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन दि.04/01/2019 रोजीच्या वस्तुस्थिती दर्शक अहवाला अन्वये ठेकेदार निश्चित दरापेक्षा पार्कींग करीता जास्त दैनंदीन व मासिक पार्कींग शुल्क वसूल करीत असल्याचे निदर्शनास आल्यावरुन ठेकेदार यांना नोटीसेस देऊन खुलासा मागविण्यात आला व मा. आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने वाहन चालक/मालक यांच्याकडून जास्त वसुल केलेली रक्कम संबंधितास परतावा करण्याकरीता लेखी पत्रान्वये सुचना देण्यात आल्या आहेत. तक्रारदार श्री. कृष्णा गुप्ता वारंवार ठेकेदार यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी करीत आहेत.

<u>मे. श्रुती एंटरप्रायजेस यांचे प्रतिनिधी श्री. अतुल ठाकूर यांनी आपले म्हणणे मांडले:-</u>

ठेकेदार यांचे प्रतिनीधी यांनी दैनिक पार्कींगसाठी रु.25 व मासिक पार्कींगसाठी रु.600 एवढी रक्कम पार्कींगसाठी येणाऱ्या नागरीकांकडून वसूल करण्यात येत असल्याचे मान्य केले. यासंदर्भात प्रशासनाने दिलेल्या निर्देशानुसार मासिक पार्कींगसाठी जादा आकारलेली प्रती वाहन रक्कम रु.187 पुढील महिन्यात म्हणजेच मार्च-2019 या महिन्याकरीता समायोजित करण्यात आलेली आहे. निविदेत नमूद केल्याप्रमाणे अ) मिरारोड रेल्वे स्टेशन बस स्टॉप जवळ आरक्षण क्र.184 या पे ॲन्ड पार्कींगच्या जागेत निश्चित केलेली 1550 पार्कींगची क्षमता ऐवढी नसुन साधारण ती 1300 पर्यंत व ब) मिरारोड रेल्वे स्टेशन समांतर स्कायवॉक खाली (सबस्टेशन व स्कायवॉक लॅडींग जवळ) या पार्कींगच्या जागेत दुचाकी पार्कींग क्षमता-180 आहे परंतू 200 वाहने पार्कींग होतात. त्यामुळे माझे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच यापूर्वीचे ठेकेदार मे. संतोष इंटरप्रायजेस यांनी यापूर्वीच नागरीकांकडून आगाऊ मासिक पासेसद्वारे पार्कींगसाठी रक्कम वसूल केलेल्या आहेत. त्यामूळे देखील आम्हाला आर्थिक भूर्दंड सोसावा लागत आहे. तसेच वेळोवेळी महानगरपलिकेच्या नोटीसीच्या अनुषंगाने आम्ही खुलासा सादर केलेला आहे. त्यामूळे त्यांच्या विरुद्ध कोणतीही कायदेशीर कार्यवाही करण्यात येवू नये. अशी विनंती केली.

वरील तक्रारीच्या अनुषंगाने सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

1) तक्रार, विभागाचे अहवाल, नोटीस व ठेकेदारांचा खुलाश्याचा अभ्यास केल्यानंतर ठेकेदार यांनी दि.26/11/2018 रोजीच्या करारनाम्याचे उल्लंघन केल्याचे सिद्ध होत आहे. याकरीता मे. श्रुती इंटरप्रायजेस यांचेसोबत दि.26/11/2018 रोजी केलेला करारनामा तातडीने रद्द करण्याची कार्यवाही उपायुक्त, पे ॲन्ड पार्क यांनी करावी.

2) ठेकेदार यांनी नागरीक व महानगरपालिकेची फसवणूक करुन करारनाम्यातील अटी शर्तीचे उल्लंघन केलेले आहे ही गंभीर बाब असल्यामुळे ठेकेदार यांनी महानगरपालिकेकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम करारनाम्यातील अट क्र.01 नुसार जप्त करण्यात यावी. याकरीता विभागाने संबंधित बँक यांना पत्र व्यवहार करुन जप्त करण्याची कार्यवाही तातडीने करावी.

3) पे ॲन्ड पार्कींगसाठी ठेकेदार यांना अ) मिरारोड रेल्वे स्टेशन बस स्टॉप जवळ आरक्षण क्र.184 व ब) मिरारोड रेल्वे स्टेशन समांतर स्कायवॉक खाली (सबस्टेशन व स्कायवॉक लॅडींग जवळ) या ठिकाणी देण्यात आलेल्या जागा करारनामा रद्द केल्यानंतर पे ॲन्ड पार्क विभाग यांनी उपायुक्त यांच्या नियंत्रणाखाली ताब्यात घेण्यात यावी व त्याप्रमाणे पंचनामा करण्यात यावा.

4) ठेकेदार यांच्याकडून पे ॲन्ड पार्कींगचा अभिलेख उदा. रजिस्टर, पावती, मासिक पासेस, संगणक मधील माहिती, पावती मशीन इ. चा ताबा घेण्यात यावा.

5) पे ॲन्ड पार्क विभागाने वरील जागेचा ताबा घेतल्यानंतर सदर पे ॲन्ड पार्कींग महानगरपलिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत चालविण्यात यावी. याकरीता आस्थापना अधीक्षक यांनी अस्तित्वात असलेल्या ठेकेदाराकडून मनुष्यबळ उदा. सुरक्षारक्षक, गाड्या लावण्यासाठी मजूर उपलब्ध करुन घेण्यात यावे व तीन पाळीत लिपीक व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी.

6) वरील जागेचा ताबा घेतल्यानंतर पे ॲन्ड पार्कींगची वसूलीचा आढावा उपायुक्त यांनी दररोज घ्यावा.

7) विभागाने वसुल केलेली रक्कमेचा दैनंदिन भरणा लेखा विभागात चलनाद्वारे करावा. याकरीता वाहन विभाग यांनी वाहन उपलब्ध करुन द्यावे.

8) वरील जागेत मनपा कर्मचारी यांना बसण्यासाठी कॅबीन (बसण्यासाठी टेबल, खुर्ची, कपाट, लॉकर), पार्कींगच्या ठिकाणी विद्युत व्यवस्था, पाणी व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्याची व्यवस्था व इतर आवश्यक व्यवस्था सार्व. बांधकाम विभागाने 03 दिवसांत करावी.

9) पे ॲन्ड पार्क विभाग यांनी मागणी केल्यानुार पावती पुस्तक भांडार विभाग यांनी 03 दिवसांत छापून देण्यात यावे. तसेच पे ॲन्ड पार्क विभागाने मंजूर केलेल्या मजकूरानुसार बोर्ड बनवून देण्यात यावा.

10)ठेकेदार यांनी पार्कीगसाठी जादा वसूल केलेली रक्कम समायोजीत किंवा परतावा केल्याची खात्री व पूर्वीच्या ठेकेदार मे. सतोष इंटरप्रायजेस यांनी मूदत संपल्यानंतरच्या कालावधीसाठी मासिक पासेस करीता वसूल केलेल्या रक्कमेची पडताळणी विभागाने करावी व त्याचा अहवाल माझ्याकडे सादर करावा.

11) सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी वरील आरक्षणामधील (अ व ब) जागेवरील वाहन पार्कींगची क्षमता तपासावी.

12) ठेकेदार मे. श्रुती इंटरप्रायजेस यांनी पे ॲन्ड पार्कींगच्या करारनाम्याचे उल्लंघन केल्याने त्यांना काळयायादीत टाकण्याची कार्यवाही उपायुक्त यांनी प्रस्तावित करावी.

13) वरीलप्रमाणे सर्व अधिकारी यांनी निर्देशाचे तंतोतंत पालन करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल माझ्याकडे सादर करावा.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:-

1) अतिरीक्त आयुक्त (उपआयुक्त (पे अ‍ॅन्ड पार्क) यांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन माझ्याकडे अहवाल सादर करावा.)
2) उपआयुक्त, पे अ‍ॅन्ड पार्क
3) विभाग प्रमुख, पे अ‍ॅन्ड पार्क
4) कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग
5) आस्थापना अधीक्षक, आस्थापना विभाग
6) विभाग प्रमुख, भांडार विभाग
7) विभाग प्रमुख, वाहन विभाग
8) मे. श्रुती इंटरप्रायजेस
9) श्री. कृष्णा गुप्ता, तक्रारदार

महाराज भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.२८१९२८२८
दि.१५/११/२०१९

प्रति,
श्री. कृष्णा गुप्ता, अध्यक्ष
मे. सत्यकाम फाऊंडेशन
एस/१०६, पटाडिया कॉम्पलेक्स,
गांधीनगर, उत्तन रोड, भाईंदर (प.)

19/11/19

विषय:- मिरारोड मध्ये पे ॲण्ड पार्कच्या नावाखाली होत असलेल्या भ्रष्टाचाराबाबत. (सत्यकाम फांऊडेशन भाईंदर (प.) यांची तक्रार) तक्रार संदर्भ क्र. ८२७ दि.२०/०३/२०१९

संदर्भ:- मा. अवर सचिव न.वि.वि.मंत्रालय मुंबई यांचेकडील मिभाम - ११९९/प्र.क्र.३७/नवि-२८/दि.०१/०४/२०१९ चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत तक्रारीच्या अनुषंगाने मा. आयुक्त सो., यांनी दि.१५/०३/२०१९ रोजी तक्रारद व ठेकेदार यांची बैठक आयोजीत केली होती. सदर बैठकीत मा. आयुक्त सो, यांनी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगा सुनावणी घेऊन निर्णयाअंती मे. श्रुती एंटरप्रायजेस यांचा ठेका तातडीने रद्द करणेबाबत निर्देश दिलेले हो त्यानूसार मे. श्रुती एंटरप्रायजेस यांच्याकडून दि.१९/०३/२०१९ रोजी सदर जागेचा ताबा घेऊन महानगरपालिके कर्मचाऱ्यामार्फत पे ॲण्ड पार्कची वसूली सुरु आहे.

सदर प्रकरणी निविदा प्रक्रिया कार्यवाही चालू असून मे. श्रुती एंटरप्रायजेस यांचे विरुध्द पुढील कार्यव प्रस्तावित आहे.

तसदी बद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू

दादासाहेब खेत्रे
विभागप्रमुख(पे ॲण्ड पार्क
मिरा-भाईंदर महानगरपालिक

प्रत :-

मा. अवर सचिव, नगरविकास विभाग, (नवी २८)
मंत्रालय, मुंबई याच्यामाहितीस्तव सादर.

E:\PAY & PARK DEPT\Letter\13. styakam foundation.

20/11/019
9664514531

Email us: satyakaamfoundation
Satyakaamfoundation
Satyakaamfoundation
/satyakaamngo
Website: www.satyakaamfoundation.com

Trust Registration No : F-35346 (THANE)

Ref. No.: SF/NP/09-10/2019

Date.: 01-03-2019

स्मरणपत्र क्र.02

मुख्यमंत्री स... २८ 13 MAR 2019 374866

नगर विकास विभाग

प्रति,
1. नगरविकास विभाग -02,
मंत्रालय, मुंबई.
2. मा.पोलीस निरीक्षक,
नयानगर पोलीस ठाणे.
3. मा.आयुक्त,
मीरा भाईदर महानगर पालिका.

विषय.: मिरा रोड रेल्वे स्टेशन बस स्टेन्ड जवळील असलेले "मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस" या पे अँड पार्कच्या ठेकेदाराने माझ्याकडून व माझ्यासारखे अनेक बाइक पार्किंग करणाऱ्या लोकांना लूट करून त्यांच्याकडुन दरापेक्षा अधिक पैशे वसूल केले म्हणून मनपा करारनामा नुसार त्यांची ठेका रद्द करून अनामत रक्कम जप्त करण्यात यावी.

संदर्भ.:
1. मा.महासभा दि.:०८/१२/२०१७, प्रकरण क्र.३७, ठराव क्र.३४.
2. दिनांक.:२६/११/२०१८ रोजीच्या मिरा-भाईदर महानगर पालिका व मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस, मिरा रोड (पूर्व) या जागेतील आरक्षण क्र.१८४ क्षेत्र २९४० चौ.मी. या जागेवर "पे अँड पार्क" अधिकार करारनामा.
3. घटना :- दिनांक.:11/12/2018 व दिनांक.:14/12/2018 रोजी सदर ठेकेदाराने माझ्याकडून 10 मिनिट पार्किंग साठी 25/- रुपये व दिनांक.:14/12/2018 रोजी एका महिन्याच्या पास साठी बेकायदेशीरपणे 600/-
माझं दिनांक.:19/12/2013 रोजीचा लेखी तक्रार ई-मेल (सोबत जोडलेला आहे).
दिनांक.: 02/01/2019 रोजीचा लेखी स्मरणपत्र.
दिनांक.: 08/01/2019 रोजी आपल्या समक्ष झालेली सुनावणी नंतर माझे दिनांक.:16/01/2019 चा खुलासा व विस्तृत स्पष्टीकरण.
दिनांक.: 30/01/2019 रोजी ठेकेदाराने माझ्याकडुन एका महिन्याचा पास करिता परत 600/- मागितले पण पावती द्यायला मनाई केली (रेकॉर्डिंग इमेल सोबत जोडत आहे)

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळवू इच्छितो कि मिरा भाईदर महानगर पालिकेतर्फे पे अँड पार्क साठी ठेकापद्धतीने "मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस" यांना मिरा रोड (पूर्व) ...

आरक्षण क्र.१८४ क्षेत्र २९६० चौ.मी, मिरा रोड रेल्वे स्टेशनच्या बाहेर ... पार्कचा ठेका दिनांक.:२६/११/२०१८ रोजीच्या करारनामा नुसार रद्द ...

महोदय, माझी टू व्हीलर बाइक क्रमांक (यमाहा फेझर, महाराष्ट्र 04 एफ.बी. ...) बाइक मी दिनांक.:11/12/2018 रोजी या पार्किंग स्थळावर पार्क केली असता ठेकेदाराने माझ्याकडून 25/- रुपये मागितले व मी त्यांना 25/- रुपये हे जास्त फी/Amount आहे म्हणून त्यांची MBMC बरोबरची कॉंट्रैक्ट कॉपी मागितली असता त्यांनी मला काहीही कॉंट्रैक्टची कॉपी दाखवण्यास मनाई केली, म्हणून मला त्यांना वीस (20) मिनिटच्या पार्किंग साठी 25/- रुपये द्यावा लागला. वरील नमूद ठेकेदार "मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस" हे मिरा-भाईंदरच्या सर्व सामान्य जनतेकडून 12 तास टू व्हीलर पार्किंग साठी 25/- रुपये इतके आकारत आहे व एका महिन्याच्या टू व्हीलर पार्किंग (मंथली पास) साठी 600/- रुपये घेतात. या पे अँड पार्क स्थळावर रोज जवळ 1500-2000 हुन अधिक बाइक चालक/मालक आपली टू व्हिलर बाइक इथे पार्क करून आपआपल्या व्यवसाय,शिक्षण,नोकरी करिता रोज मिरा रोड वरून मुंबई,नवी मुंबई,ठाणे ट्रेन पकडून जातात, म्हणून ते बाइक पार्क करताना सदर ठेकेदार हे त्यांच्याकडून अधिक पैसे घेतो याबाबत विचारपूस करण्यास त्यांच्याकडे वेळ नसतात.

म्हणून मी आपल्याला दिनांक:-19/12/2018 रोजीचा लेखी एमैल वरून हि तक्रार दिली होती, परंतु त्यावर काहीही कार्यावाई न झाल्याने मी परत आपल्याला दिनांक.: 02/01/2019 रोजीचा लेखी स्मरणपत्र नुसार संबंधित श्रुती एन्टरप्राईझेस यांच्यावर आपल्या मनपाच्या करारनामा नुसार त्यांचा ठेका रद्द करून अनामत रक्कम जप्त करण्याची कार्यावाई करण्यास विनंती केली होती. परंतु आपल्या मीरा भाईंदर मनपा मधील पे अंड पार्कच्या भ्रष्ट कारभारामुळे ती कारवाई अजून हि प्रलंबित आहे, आणि मी दिनांक.: 30/01/2019 रोजी परत त्या पे अंड पार्क वाल्याकडे गेलो तर त्यांनी परत माझाकडून एका महिन्याचे पास करिता रु. 600/- ची मागणी केली आणि मी पैसे द्यायला राजी झालो. परंतु जेव्हा त्यांचा कडून एका महिन्याचा पास करिता रु. 600/- ची पावती मागितली तर ते द्यायला त्यांनी मनाई केली (याबाबत ची व्हिडियो रेकॉर्डिंग हि माझ्याकडे उपलब्ध असून, ते मी सुनावणी दरम्यान दाखवून सादर करू शकतो) महोदय, या घटण्याची माहिती मी मीरा भाईंदर मनपा पे अंड पार्क अधिकारी श्री.जगदीश भोपतराव यांना हि सूचित केला परंतु त्यांनी काहीही उत्तर न देता हे काम उप-आयुक्त श्री.दीपक पुजारी यांचा सही साठी प्रलंबित आहे असा फक्त सांगितला. महोदय, हजारो लोकांची प्रत्येक दिवशी बेकायदेशीरपणे लूट होत आहे, आणि मी यापूर्वी हि आपल्याला निवेदन केलो होतो कि ठेकेदारासोबत झालेल्या करारनाम्यानुसार संबंधित ठेकेदाराचे अनामत रक्कम जप्त करून याबाबत ची सखोल चौकशी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे पाठवावी अशी विनंती करून सुद्धा भ्रष्ट अधिकारी आपली जबाबदारी ढकलून कारवाई करण्यास टाळाटाळ करता आहेत. म्हणून महोदय आपल्याला परत विनंती करतो कि मनपा सोबत ठेकेदाराचे *"दिनांक.:२६/११/२०१८ रोजीच्या मिरा-भाईंदर महानगर पालिका व मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस, मिरा रोड (पूर्व) या जागेतील आरक्षण क्र.१८४ क्षेत्र २९६० चौ.मी. या जागेवर "पे अँड पार्क" अधिकार करारनामा,* नुसार पे अंड पार्कच्या ठेकेदाराने

उल्लंघन केल्यामुळे त्यांची ठेका रद्द करून अनामत रक्कम जप्त करून त्यांना काळ्या त समाविष्ट करण्यात यावी हि विनंती करतो.

महोदय, संदर्भ क्र.०१. "मा.महासभा दि.:०८/१२/२०१७, प्रकरण क्र.३७, ठराव क्र.३४" पार्किंगच्या सुधारित दर नुसार बारा(12) तासा करिता टू वहिलर पार्किंग साठी 20/- रुपये व चोवीस(24) तासा करिता 25/- रुपये आणि एका महिन्याचा(मंथली) पास साठी 350/- रुपये असा महासभेच्या ठरावानुसार व नियमानुसार निर्धारित केले गेलेले आहे.

व संदर्भ क्र.०२ च्या दिनांक.:26/11/2018 रोजीच्या उप-आयुक्त, मिरा भाईंदर महानगर पालिका व मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस यांच्या करारनामेच्या पानं क्र.०२ मध्ये असा स्पष्ट उल्लेख आहे कि ठेकेदाराला पे अँड पार्क च्या पार्किंग चार्जेस "मा.महासभा दि.:08/12/2017, प्रकरण क्र.३७, ठराव क्र.३४" मध्ये नमूद दरानुसारच घ्यावा लागेल.

परंतु महोदय, सदर "मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस" हे मा.महासभाच्या ठराव व महापालिकेच्या सर्व नियमांच्या उल्लंघन करून मिरा रोडच्या स्थानिक प्रवास करणाऱ्या 1500 हुन अधिक बाइक चालकांकडून त्यांची मेहनतीची कमाई लुटण्याचा काम करत आहेत. महोदय,सदर ठेकेदार हे 12 तासकरिता 25/- रुपये आणि मंथली पास साठी 600/- रुपये घेतो परंतु नियमानुसार त्यांना 12 तासा करिता 20/- रुपये आणि मंथली पास साठी 350/- रुपये इतकेच घ्यायचे आहे.

म्हणजे एका दिवसात सदर ठेकेदार 12 तास बाइक पार्क करणाऱ्या सामान्य 1500 बाइक चालकांकडून रु.05/- अधिक घेऊन दिवसाच्या तब्बल रु.7500 x 30 म्हणजे महिन्याचा तब्बल 2,25,000/- रुपये बेकायदेशीरपणे कमावतो आणि मंथली पास घेणाऱ्या अंदाजे 500 बाइक चालकांकडून रु.600/- नुसार "रु.250/-" अधिक घेऊन महिन्याचा तब्बल रु.1,25,000/- बेकायदेशीरपणे कमावतो.

म्हणजे सदर ठेकेदार एका महिन्याचा फक्त अधिक पैशे वसूल करून रु 2,25,000 + 1,25,000 = 3,50,000/- रुपये किंवा अधिक असे बेकायदेशीर पणे गेल्या एक महिन्यापासून कमाई करत आहेत.

सदर "मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस" हे मा.महासभा व महापालिकेच्या सर्व नियमांच्या उल्लंघन करून स्थानिक जनतेच्या मेहनतीची कमाई लुटण्याचा काम करत आहेत. आणि माझ्याकडून ठेकेदाराने दिनांक.:11/12/2018 रोजी 20 मिनिट पार्किंग साठी 25/- रुपये व दिनांक.:14/12/2018 रोजी एका महिन्याच्या पास साठी बेकायदेशीरपणे 600/- रुपये घेतलेले आहे, ज्याची लेखी तक्रार मी आपणांस दिनांक:19/12/2018 रोजी ई-मेल द्वारे केलेली असून त्यावर अजूनही काही कारवाई झालेली नाही. व परत दिनांक.: 02/01/2019 रोजीचा लेखी स्मरणपत्र नुसार आपल्याला कारवाई करण्यास विनंती केलो होतो आणि आपल्या समापाक्ष दिनांक.: 08/01/2019 रोजीच्या सुनावणी नंतर मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस यांच्या लेखी खुलासा नंतर माझाहि लेखी म्हणन मी आपल्याला दिनांक.:16/01/2019 रोजी दिली असून आणि आपल्याला प्रत्यक्ष या विषयावर सांगून सुद्धा आपण यावर कारवाई न करून टाळाटाळ

उल्लंघन केल्यामुळे त्यांचा ठेका रद्द करून अनामत रक्कम जप्त करून त्यांना काळ्या यादीत समाविष्ट करण्यात यावी हि विनंती करतो.

महोदय, मेसर्स क्र. ०५ "मा.महासभा दि. ०८/१२/२०१७, प्रकरण क्र. ३७, ठराव क्र. ३८" पार्किंगच्या सुधारित दर नुसार बारा(12) तास करिता दुचाकी पार्किंग साठी 20/- रुपये व चोवीस(24) तास करिता 25/- रुपये आणि एका महिन्याच्या(मासिक) पास साठी 350/- रुपये असा महासभेच्या ठरावानुसार व नियमानुसार निर्धारित केले गेलेले आहे.

व मेसर्स क्र. ०५ च्या दिनांक.:26/11/2018 रोजीच्या उप-आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका व मेसर्स श्रुती एन्टरप्राइजेस यांच्या करारनाम्याच्या पान क्र. ०५ मध्ये असा स्पष्ट उल्लेख आहे कि ठेकेदाराला पे अँड पार्क च्या पार्किंग चार्जेस "मा.महासभा दि.08/12/2017, प्रकरण क्र. ३७, ठराव क्र. ३८" मध्ये मंजूर दरानुसारच घ्यावा लागेल.

परंतु महोदय, सदर "मेसर्स श्रुती एन्टरप्राइजेस" हे मा.महासभेच्या ठराव व महापालिकेच्या सर्व नियमांच्या उल्लंघन करून मिरा रोडच्या स्थानिक प्रवास करणाऱ्या 1500 हुन अधिक वाहक चालकांकडून त्यांची मेहनतीची कमाई लुटण्याचा काम करत आहेत. महोदय, सदर ठेकेदार हे 12 तासकरिता 25/- रुपये आणि मासिक पास साठी 600/- रुपये घेतो परंतु नियमानुसार त्यांना 12 तास करिता 20/- रुपये आणि मासिक पास साठी 350/- रुपये इतकेच घ्यायचे आहे.

म्हणजे एका दिवसात सदर ठेकेदार 12 तास वाहन पार्क करणाऱ्या सामान्य 1500 वाहक चालकांकडून रु.05/- अधिक घेऊन दिवसाच्या तब्बल रु.7500 x 30 म्हणजे महिन्याचा तब्बल 2,25,000/- रुपये बेकायदेशीररित्या कमावतो आणि मासिक पास घेणाऱ्या अंदाजे 500 वाहक चालकांकडून रु.600/- नुसार "रु.250/-" अधिक घेऊन महिन्याचा तब्बल रु.1,25,000/- बेकायदेशीररित्या कमावतो.

म्हणजे सदर ठेकेदार एका महिन्याचा फक्त अधिक पैसे वसूल करून रु 2,25,000 + 1,25,000 = 3,50,000/- रुपये किंवा अधिक असे बेकायदेशीर पणे गेल्या एक महिन्यापासून कमाई करत आहेत.

सदर "मेसर्स श्रुती एन्टरप्राइजेस" हे मा.महासभा व महापालिकेच्या सर्व नियमांच्या उल्लंघन करून स्थानिक जनतेच्या मेहनतीची कमाई लुटण्याचा काम करत आहेत. आणि माझ्याकडून ठेकेदाराने दिनांक.:11/12/2018 रोजी 20 मिनिट पार्किंग साठी 25/- रुपये व दिनांक.:14/12/2018 रोजी एका महिन्याच्या पास साठी बेकायदेशीररित्या 600/- रुपये घेतलेले आहे, ज्याची लेखी तक्रार मी आपणास दिनांक:19/12/2018 रोजी ई-मेल द्वारे केलेली असून त्यावर अजूनही काही कारवाई आलेली नाही. व पत्र दिनांक.: 02/01/2019 रोजीच्या लेखी स्मरणपत्र नुसार आपल्याला कारवाई करण्यास विनंती केली होती आणि आपल्या समक्ष दिनांक.: 08/01/2019 रोजीच्या सुनावणी नंतर मेसर्स श्रुती एन्टरप्राइजेस यांच्या लेखी खुलासा नंतर माझाहि लेखी म्हणून मी आपल्याला दिनांक.:16/01/2019 रोजी दिली असून आणि आपल्याला प्रत्यक्ष या विषयावर सांगून सुद्धा आपण यावर कारवाई न करून टाळाटाळ

करत आहात म्हणून या प्रकरणामध्ये अधिकारी भ्रष्ट आहेत असा स्पष्ट ... आहात. व परत दिनांक.: 30/01/2019 रोजी एका महिन्याचा पास ... तेव्हा पुन्हा ठेकेदार हे आमच्याकडून व सर्व सामान्य लोकांकडून रु. 600/- एवढे ... पावती देण्यास आता मनाई करतात. म्हणून, या सामाणपत्राद्वारे आपणांस परत विनंती ... कि कोणत्याही विलंब न करता सदर ठेकेदारावर भारतीय दंड विधान (IPC) 420 नुसार गुन्हा दाखल करण्यात यावा व सदर ठेकेदार हे महापालिकेच्या नावावर बेकायदेशीरपणे जनतेच्या मेहनतीच्या रुपयांची लूट करत आहेत म्हणून "मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस" यांच्यावर शासकीय यंत्रणेच्या नावावर भ्रष्टाचार करत आहेत म्हणून पुढील सखोल चौकशी ठाणे - अँटी करप्शन ब्युरो कडे पाठवावी व दिनांक.:२६/११/२०१८ रोजीच्या मिरा-भाईंदर महानगर पालिका व मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस, मिरा रोड (पूर्व) या जागेतील आरक्षण क्र.१८४ क्षेत्र २९४० चौ.मी. या जागेवर "पे अँड पार्क" अधिकार करारनामा नुसार सदर ठेकेदाराचे ठेका रद्द करून त्यांची संपूर्ण जमा रक्कम जप्त (Seize the Deposit amount) करावी, व त्याला ब्लॅक लिस्ट करण्यात यावी हि विनंती करतो.

[संलग्न:- 1.सदर ठेकेदाराचे लोक 12 तासा पार्किंग करिता रु.25/- व एका महिन्याचा पास करिता रु.600/- मागण्याचे विडिओ क्लिप माझ्याकडे पुरावा म्हणून उपलब्ध असून सुनावणी दरम्यान तो विडिओ क्लिप आपल्या समक्ष देण्यास माझी तयारी आहे..

2. मला 20 मिनिट साठी पार्किंग करिता रु.25/- व एका महिन्याच्या पास करिता रु.600/- घेतल्याचे बिल/receipt सोबत जोडलेला आहे.

3. मा.महासभा दि.:०८/१२/२०१७, प्रकरण क्र.३७, ठराव क्र.३४.(मि.भा.मनपा संकेतस्थळावर उपलब्ध आहे)

4. दिनांक.:२६/११/२०१८ रोजीच्या मिरा-भाईंदर महानगर पालिका व मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस, मिरा रोड (पूर्व) या जागेतील आरक्षण क्र.१८४ क्षेत्र २९४० चौ.मी. या जागेवर "पे अँड पार्क" अधिकार करारनामाची ((मि.भा.मनपा संकेतस्थळावर उपलब्ध आहे) ]

5. माझं दिनांक..19/12/2018 रोजीचा लेखी तक्रार ई-मेल (सोबत जोडलेला आहे).

6. दिनांक.: 02/01/2019 रोजीचा लेखी स्मरणपत्र.

7. दिनांक.: 08/01/2019 रोजी आपल्या समक्ष झालेली सुनावणी नंतर माझे दिनांक.:16/01/2019 चा खुलासा व विस्तृत स्पष्टीकरण.

8. दिनांक.: 30/01/2019 रोजी ठेकेदाराने माझ्याकडुन एका महिन्याच्या पास करिता परत रु. 600/- मागितले पण पावती द्यायला मनाई केली (रेकॉर्डिंग इमेल सोबत जोडत आहे)

कळावे,

आपला विश्वासू,

०१/०२/१९

कृष्णा सी. गुप्ता

(264)

...mail

Krishna Gupta <kcgupta.1997@gmail.com>

## ...ड रेल्वे स्टेशन बस स्टेन्ड जवळतील असलेले "मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस" या पे अँड ...च्या ठेकेदारावर IPC 420 नुसार गुन्हा दाखल करणे बावत.

...na Gupta <kcgupta.1997@gmail.com>
...@maharashtra.gov.in, sec.ud2@maharashtra.gov.in, governor-mh@nic.in, Secretary Governor <secy.rb-...@nic.in>, mbmc.commissioner@gmail.com, Mira bhayandar municipal corporation Head office ...mbmcho@gmail.com>, Saee Vadke <mbmclawdept@gmail.com>, add.commdalan@gmail.com, Vijaykumar ...al <dycommissionerhqmbmc@gmail.com>, collector.thane@maharashtra.gov.in, ...ectorofficethane@gmail.com, dclmms@yahoo.in, dydm-mh@gov.in, helpline.mhpds@gov.in

Wed, Dec 19, 2018 at 10:09 PM

प्रति,

1. **मा.राज्यपाल,**
महाराष्ट्र राज्य.
**मा.मुख्यमंत्री,**
...राष्ट्र राज्य.
...नगरविकास विभाग -02,
...लय, मुंबई.
4. **मा.जिल्हाधिकारी,**
ठाणे.
5. **मा.आयुक्त,**
मीरा भाईंदर महानगर पालिका.
6. **मा.अतिरिक्त आयुक्त,**
मीरा भाईंदर महानगर पालिका.

विषय : **मिरा रोड रेल्वे स्टेशन बस स्टेन्ड जवळतील असलेले "मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस" या पे अँड पार्कच्या ठेकेदारावर IPC 420 नुसार गुन्हा दाखल करणे बावत.**
संदर्भ : मा.महासभा दि.:०८/१२/२०१७, प्रकरण क्र.३७, ठराव क्र.३४.

महोदय,
...रोक्त विषयानुसार आपणांस कळवू इच्छितो कि मिरा भाईंदर महानगर पालिकेतर्फे पे अँड पार्क ...ठेकपद्धतीने "मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस" यांना मिरा रोड रेल्वे स्टेशनच्या बाहेर बस स्टॅन्ड ...ळ पे अँड पार्कचा ठेका देण्यात आलेला आहे.

महोदय, माझी टू व्हीलर बाइक क्रमांक (महाराष्ट्र 04 एफ.वाय.5973) हि बाइक मी दिनांक.:11/12/2018 रोजी या पार्किंग स्थळावर पार्क केली असता ठेकेदाराने माझ्याकडून 25/- रुपये मागितले व मी त्यांना 25/- रुपये हे जास्त फी/Amount आहे म्हणून त्यांची MBMC कॉंट्रॅक्टची कॉपी मागितली असता त्यांनी मला काहीही कॉंट्रॅक्टची कॉपी दाखवण्यास मनाई केली व **मला त्यांना वीस (20) मिनिटच्या पार्किंग साठी 25/- रुपये द्यावा लागला. वरील नमूद ठेकेदार "मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस" हे मिरा-भाईंदरच्या सर्व सामान्य जनतेकडून 12 तास टू व्हीलर पार्किंग साठी 25/- रुपये इतके आकारत आहे व एका महिन्याच्या टू व्हीलर पार्किंग**

(मंथली पास) साठी 600/- रुपये घेतात.

महोदय, संदर्भीय "मा.महासभा दि.:०८/१२/२०१७, प्रकरण क्र.३७, ठराव क्र.३४" पार्किंगच्या सुधारित दर नुसार बारा (12) तासा करिता टू वहिलर पार्किंग साठी 20/- रुपये व चोवीस (24) तासा करिता 25/- रुपये आणि एका महिन्याचा(मंथली) पास साठी 350/- रुपये नियमानुसार असे निर्धारित केले आहे.

परंतु सदर **"मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस" हे मा.महासभा व महापालिकेच्या सर्व नियमांच्या उल्लंघन करून स्थानिक जनतेच्या मेहनतीची कमाई लुटण्याचा काम करत आहेत.** म्हणून, आपणांस विनंती करतो कि कोणत्याही विलंब न करता सदर ठेकेदारावर भारतीय दंड विधान (IPC) 420 नुसार गुन्हा दाखल करण्यात यावा व **सदर ठेकेदार हे महापालिकेच्या नावावर बेकायदेशीरपणे जनतेच्या मेहनतीच्या रुपयांची लूट करत आहेत म्हणून "मेसर्स श्रुती एन्टरप्राइझेस" यांच्यावर शासकीय यंत्रणेच्या नावावर भ्रष्टाचार करत आहेत म्हणून पुढील सखोल चौकशी ठाणे - अँटी करप्शन ब्युरो कडे पाठवावी हि विनंती करतो.**
आणि माझ्याकडून ठेकेदाराने दिनांक.:11/12/2018 रोजी हाल्फ डे पार्किंग साठी 25/- रुपये व दिनांक.:14/12/2018 रोजी एका महिन्याच्या पास साठी बेकायदेशीरपणे 600/- रुपये घेतलेले आहे. म्हणून मला महापालिके तर्फे माझी नुकसान भरपाई कॉम्पेनसशन(Compensation) देण्यात यावा हि विनंती करतो आणि जर महापालिका मला झालेल्या त्रासामुळे नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करतील तर मला मिरा-भाईंदर महानगर पालिके विरुद्ध मा.न्यायालयात व जिल्हा Consumer कोर्टात जाऊन दाद मागावी लागेल.

1.सदर ठेकेदाराचे लोक 12 तासा पार्किंग करिता रु.25/- व एका महिन्याचा पास करिता 600/- मागण्याचे विडिओ क्लिप माझ्याकडे पुरावा म्हणून उपलब्ध आहे.
... 20 मिनिट साठी पार्किंग करिता रु.25/- व एका महिन्याच्या पास करिता रु.600/- ...चे बिल/receipt सोबत जोडलेला आहे.
(सदर पत्रावर केलेल्या कार्यवाहीची एक प्रत मला देण्यात यावा.)
...

18/12/18

आपला विश्वासू,
कृष्णा सी. गुप्ता
(स्थानिक नागरिक /अध्यक्ष-सत्यकाम फाऊंडेशन)
...१/१०४, पटाडीया कॉम्पलेक्स गांधी नगर, उत्तन रोड, भाईंदर (प), ठाणे ४०११०१
मो.: 8424823262

Attachments

...ING AT OWNERS AT RISK

...NO: 001-01507 SHIFT: 1
... CODE: 01 OP. NAME: AAA
... TWO WHEELER 12HRS RS.25
... 18 10:06:11 H:10411438

PARKING CHARGES : ₹.25.00

VEH. NO: 5973

**M.B.M.C. (PAY-N-PARK)**

Serial No : 275 Date : 14-12-18

**TWO WHEELER PAY N PARK** MONTHLY PASS

... 600/- Months one

...cle No. : MH04EY 5973

... : Rent Paid Once is not Refundable
... will take amount only for parking Place
not for security of vehicle

**PARKING AT OWNERS RISK**

ADP - 13-01-19

मिरा भाईंदर महानगरपालिका

o/c

पे अॅन्ड पार्क विभाग
जा.क्र.मनपा/पेअॅन्डपार्क/121/2018-19
दि. 19/3/2019

प्रति,
मे. श्रुती इंटरप्रायजेस,
ए/103, मथुरा निकेतन,
कस्तुरी गार्डन,
भाईंदर (प.), ता.-ठाणे.
मोबा. नं. -9967025610.

विषय :- (अ) मिरा रोड स्टेशन जवळील मिरा रोड (पूर्व) या जागेतील आरक्षण क्र. 184 क्षेत्र 2,940 चौरस मीटर व (ब) मिरा रोड रेल्वे स्टेशन समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लॅडींगजवळ)ठेका रद्द करणेबाबत

संदर्भ :- 1) जा.क्र.मनपा/पेअॅन्डपार्क/71/2018-19, दि.27/11/2018 रोजीचा कार्यादेश.

2) दि.26/11/2018 रोजीचा करारनामा.

3) जा.क्र.मनपा/पेअॅन्डपार्क/118/2018-19, दि.15/03/2019 रोजीचा सुनावणीचा इतिवृत्तांत.

**आदेश**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील (अ) मिरा रोड स्टेशन जवळील मिरा रोड (पूर्व) या जागेतील आरक्षण क्र. 184 क्षेत्र 2,940 चौरस मीटर व (ब) मिरा रोड रेल्वे स्टेशन समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लॅडींगजवळ) येथील वाहनतळ या जागी परिशिष्ट 'डी' मधील नमूद पार्कींग क्षमतेसाठी खाजगी संस्थेमार्फत एक वर्षाच्या कालावधीसाठी पे अॅन्ड पार्क योजना राबविणेकरीता आणि वाहन चालक/मालकांकडून पार्कींग चार्जेस वसूल करणेकरीता मे. श्रुती इंटरप्रायजेस अर्थात आपल्यासोबत महानगरपालिकेने दि.26/11/2018 रोजी करारनामा केलेला आहे. तसेच संदर्भ क्र.01 अन्वये आपणांस पे अॅन्ड पार्क चालविणेकरीता दि.01/12/2018 ते दि.30/11/2019 पर्यंत या 01 वर्षाच्या कालावधीकरीता परवानगी देण्यात आलेली आहे.

महानगरपालिका आरक्षण क्र.184 मिरारोड रेल्वेस्टेशन, मिरारोड पुर्व येथील वाहन तळाच्या 2940 चौ. मी. मध्ये 1550 दुचाकी वाहने उभी राहण्याची क्षमता आहे. तसेच

मिरारोड रेल्वे स्टेशन समांतर स्काय वॉक खाली 180 दुचाकी वाहन उभी राहण्याची क्षमता आहे. सदर ठेक्याबाबतचे दरपत्रक व त्यावर 18% जी.एस.टी. खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वाहने | तास व रुपये | तास व रुपये | तास व रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | खाजगी वाहने | 6 तासा करीता | 12 तासा करीता | 24 तासा करीता | महिन्याचा पास |
| i. | सायकल | रु. 3 + GST 18% = रु.3.54 पूर्णांकात=रु.4.00 | रु. 5+ GST 18%= रु.5.90 पूर्णांकात=रु.6.00 | रु. 10+ GST 18%= रु.11.80 पूर्णांकात=रु.12.00 | रु. 150+ GST 18%= रु.177 पूर्णांकात=रु.177 |
| ii. | दुचाकी वाहने | रु. 15 + GST 18%= रु.17.7 पूर्णांकात=रु.18.00 | रु. 20 + GST 18%= रु.23.6 पूर्णांकात=रु.24.00 | रु. 25 + GST 18%= रु.29.50 पूर्णांकात=रु.30.00 | रु. 350 + GST 18%= रु.413 पूर्णांकात=रु.413.00 |

श्री. कृष्णा गुप्ता यांच्या दि.19/12/2018, दि.02/01/2019, दि.05/01/2019, दि.09/01/2019, दि.16/01/2019, दि.11/02/2019, दि.13/02/2019, दि.17/02/2019, दि.21/02/2019 तसेच श्री. प्रदीप जंगम, जिद्दी मराठा यांच्या दि.19/12/2018 रोजीच्या तक्रारी अन्वये आपल्यामार्फत पार्कींग करण्यासाठी येणाऱ्या नागरीकांकडून निश्चित दरापेक्षा दैनंदीन व मासिक पार्कींग करीता जास्त पार्कींग शुल्क वसूल करीत असल्यामुळे सदर ठेकेदार यांच्याविरुद्ध कार्यवाही करुन त्यांच्यासोबत केलेला करारनामा रद्द करण्यात यावा व ठेकेदार यांनी महानगरपालिकेकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन ठेकेदार यांच्याविरुद्ध संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने दि.27/12/2018 रोजी आपणांस अटी शर्तीचा भंग करुन महानगरपालिकेची फसवणूक व नागरीकांची लूट करीत असल्याचे दिसून येत असल्याबाबत खुलासा मागविण्यात आला होता. त्याअनुषंगाने आपण दि.27/12/2018 रोजी वाहन पार्कींग फी रु.24 ठेवलेली असून त्यात 25 रुपये फी घेतलेली आहे व मासिक पासाकरीता आहेत त्या रुपयाचे पासाचे पैसे घेतलेले आहे. सदर ज्या व्यक्तीकडून एक एक रुपया जास्त घेतलेली असून त्याचे चार दिवस पूर्ण झाल्यानंतर पाचव्या दिवशी फक्त वीस रुपये घेतले जातात व मासिक पासाचे त्या रुपयाचे पासचे पैसे आकारले जातात अशा बाबतचा खुलासा आपल्याकडून महानगरपालिकेला देण्यात आला होता.

वरील तक्रारीच्या अनुषंगाने पे ॲन्ड पार्क विभागामार्फत शहानिशा करण्याकरीता प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून दि.04/01/2019 रोजी पाहणी केली असता ठेकेदार प्रती दुचाकी वाहन रक्कम रु.25/- याप्रमाणे मासिक पासाची रक्कम एकुण मासिक पास संख्या 890 पैकी रु.700/- प्रमाणे 8 पासेस देण्यात आले आहेत. व उर्वरीत 882 पासेस रु.600/- प्रमाणे मासिक पासेस देण्याचे उपलब्ध असलेल्या नोंद रजिस्टर प्रमाणे दिसून आलेले आहे. त्याअनुषंगाने एकुण रक्कम रु.5,34,800/- वसूल करण्यात आले, वास्तविक रक्कम रु.3,67,570/- येणे आवश्यक होते. म्हणजेच आपण रक्कम रु.1,67,230/- जादा आकारल्याचे दिसून येत आहे. तसेच महानगरपालिकेने ठेकेदाराला दिलेल्या जागेव्यतिरीक्त इतर जागा वापरत असल्याचे दिसून आले सदर जागेत अंदाजे 30 ते 35 दुचाकी वाहन उभी करण्यात

आली होती तसेच रेल्वे स्टेशन समांतर स्कायवॉक खाली सबस्टेशन व स्कायवॉक खालील जवळ असलेल्या दुकानांचे मालक पार्किंग करत असल्याचे दिसून आले. सदर ठिकाणी करारनाम्याप्रमाणे महापालिकेस मंजूर [illegible] आवश्यक आहे. अशाबाबतचा पत्रव्यवहार महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेला आहे.

तसेच वस्तुस्थिती दर्शक अहवाल [illegible] पार्किंग करीता जास्त दैनंदिन व मासिक पार्किंग शुल्क वसूल करीत असल्याचे दिसून आले आहे. त्यानुसार मा.अतिरिक्त आयुक्त यांचेकडे दि.08/01/2019 रोजी सुनावणी व आवश्यक सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीत आपणाकडून खुलासा मागविण्यात आला. त्यानंतरही सुनावण्या घेण्यात आलेल्या आहेत. सदर सुनावणीच्या अनुषंगाने आपणांस दि.11/02/2019 रोजी नोटीस देऊन पे अॅन्ड पार्क या ठिकाणी मंजूर दिलेल्या [illegible] अतिरिक्त जागेचा पार्किंगसाठी वापर करीत असल्यामुळे तसेच दि.13/02/2019 जा.क्र.मनपा/[illegible]/110/2018-19 या पत्रान्वये पे अॅन्ड पार्क मासिक पासधारक जादा वसूली रक्कम रु.1,67,230/- संबंधित दुचाकी धारकांना परतावा करणे किंवा पुढील मासिक पासमध्ये रक्कम अॅडजस्टमेंट करून असल्याबाबतचा तपशील नाव, वाहन क्रमांक व रक्कम अॅडजस्टमेंट किंवा परतावा रक्कमेबाबत यादी 07 दिवसांत पे अॅन्ड पार्क विभागास सादर करावयाचे, तसेच यापुढे करारनाम्यातील अटी शर्तींचे पालन न केल्यास दि.28/11/2018 रोजीचा करारनामा रद्द करण्यात येईल, व महानगरपालिका यांचेकडे ठेकेदाराने जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन ठेकेदार यांचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल, असे आपणांस कळविण्यात आले आहे.

